**नियमीत फौजदारी खटला क्रं. १६०/२०२४**
**शासन वि. जाफर हीलालपुरे**
**नि.क्र.२१**

**सरकार तर्फे साक्षीदार क्रं. १**

**नांव – मोहीन इसाक भांडे,**

**वय – २५ वर्षे, कामधंदा – शेती**

**रा. – मरसांगवी ता. जळकोट जि. लातुर**

**साक्षीदार क्रमांक १ यांच्या शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री. ए.एस. कदम यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

नवरा बायकोमध्ये भांडणे झाली होती. त्यांचे भांडण त्यांच्या घरात झाले होते. त्यावेळी कोणालाही शारिरीक इजा झालेली नव्हती. असे काही झाले नाही की, जाफर याने माझ्या डोक्यात दगड मारुन मला जखमी केले.

**साक्षीदार याला फितुर घोषित करुन सरकार तर्फे उलटतपास**

फरजाना हि नात्याने माझी बहीण आहे. जाफर हिलालपुरे हा तिचा पती आहे. असे काही झाले नाही की, आरोपी माझ्या बहिणीला कायम मारहाण करत असतो. हे म्हणणे बरोबर आहे की, दि. १७/०४/२०२४ रोजी जाफर याला समजावुन सांगण्यासाठी गेलो होतो. असे काही झाले नाही की, माझ्या समोर आरोपी माझ्या बहिणीला मारत होता, मी सोडवण्यासाठी मध्ये पडलो असता त्याने माझ्या डोक्यात दगड मारुन मला जखमी केले. मला फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. आरोपीसोबत माझी कोर्टाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

<u>**नियमीत फौजदारी खटला क्रं. १६०/२०२४**</u>
<u>**शासन वि. जाफर हीलालपुरे**</u>
<u>**नि.क्र.२१**</u>

**साक्षीदार क्र. १ यांच्या शपथेवर उलटतपास आरोपी तर्फे श्री एम. एन. बिरादार वकील**

जाफर विरुद्ध आम्हाला केस चालवायची नाही. फिर्यादीमध्ये काय लिहीले होते ते मला माहीत नाही. मला सही करायला सांगितले होते म्हणुन मी सही केली होती.

पुनःतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/–

दिनांक – २०/०८/२०२६

न्यायदंडाधिकारी प्र.व.
(न्यायालय क्रं. १), उदगीर.